<u>अर्थसंकल्पीय अनुदान वर्ष २०१७-१८.</u>
नगरपालिका व नगरपरिषद यांच्या (स्थानिक संस्था) नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजनांसाठी (विशेष घटक योजना) अनुदान.
मागणी क्र.वाय-२, २२१५, (२२१५ २०६२) (वेतनेतर)
वसमतनगर नगरपरिषद, जिल्हा हिंगोली

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः नादव-१११७/प्र.क्र.६६/पापु-२१
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक :- २८ फेब्रुवारी, २०१८

वाचा :-

१. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं - २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७
२. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक : नादव-१११७ /प्र.क्र.४८ /पापु-२१ दि. २ जून, २०१७.
३. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक : नादव-१११७ /प्र.क्र.२६ /पापु-२१ दि. ३ जून, २०१७.
४. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक: नादव -१११७ /प्र. क्र. ४६ / पापु -२१ दि. ७ ऑगस्ट, २०१७.
५. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक: नादव-१११७ / प्र.क्र.४४ / पापु-२१ दि. २७ सप्टेंबर, २०१७.
६. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक: नादव-१११७ / प्र.क्र.११ / पापु-२१ दि. १५ फेब्रुवारी , २०१८.

<u>प्रस्तावना</u>

सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षासाठी नागरी पाणी पुरवठा कार्यक्रम, या योजनेतंर्गत मागणी क्रमांक वाय-२, २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१-पाणी पुरवठा, १९२ - नगरपालिका/नगरपरिषदांना सहाय्य (०२) राज्य योजना-(०२) (१०) नगरपालिका व नगरपरिषद यांच्या नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजनांसाठी सहाय्यक अनुदान (विशेष घटक योजना) (२२१५ २०६२) ३१, सहाय्यक अनुदान, (वेतनेतर), या लेखाशिर्षाखाली रुपये ५,००,००,०००/- (रुपये पाच कोटी फक्त) एवढे अर्थसंकल्पीय अनुदान मंजूर करण्यात आले असून अर्थसंकल्पीय अनुदानाच्या ९० टक्के म्हणजेच रु.४,५०,००,०००/- (रुपये चार कोटी पन्नास लाख फक्त) एवढे अनुदान अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरणासाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

२. शासन निर्णय, क्रमांक नादपि-२००४/प्र.क्र.२८/पापु-२२, दिनांक २५ ऑगस्ट, २००६ अन्वये, नागरी भागातील दलित वस्त्यांकरीता पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजना नियमित राबविण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयान्वये, नागरी पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजनेच्या धोरणात्मक बाबी, योजनेचे सुधारीत व सर्वंकष निकष तसेच योजनेची कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे.

३. नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजनांतर्गत घ्यावयाच्या कामांकरीता नागरी स्वराज्य संस्थांना ९० टक्के अनुदान आणि १० टक्के लोकवर्गणी असा वित्तीय आकृतीबंध विहीत करण्यात आला असून नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजनांतर्गत अनुदानाची रक्कम विशेष घटक योजने अंतर्गत आहे.

४. नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजने अंतर्गत हाती घ्यावयाच्या कामांसाठी नागरी स्वराज्य संस्थांच्या वर्गवारीनुसार (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून) पुढीलप्रमाणे कमाल शासकीय अनुदान अनुज्ञेय आहे.

(रुपये लाखात)

अ.क्र.	नागरी स्थानिक स्वराज्य संस्था	कमाल अनुज्ञेय अनुदान
१	महानगरपालिका	३२.००
२	अ-वर्ग नगर परिषद	१५.००
३	ब-वर्ग नगर परिषद	१२.००
४	क-वर्ग नगर परिषद	१०.००

५. जिल्हाधिकारी, हिंगोली यांना जिल्हयातील संबंधित नागरी संस्थांना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदी मधून (विशेष घटक योजना) (योजनांतर्गत) सदर लेखाशिर्षा अंतर्गत अनुदान मंजूर व मुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान मंजूर व मुक्त करण्याचा पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय</u>

नागरी पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत, " नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजना " या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरीता जिल्हाधिकारी यांच्याकडे नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजनेच्या जिल्हा स्तरावरील संनियंत्रणाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. जिल्हाधिकारी यांना या कार्यक्रमाच्या अनुषंगाने आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. हया कार्यक्रमाकरीता शासनाकडून जिल्हाधिकारी, हिंगोली यांचेमार्फत वसमतनगर नगपरिषदेस रु. १२,००,०००/- (रुपये बारा लाख फक्त), इतके अनुदान या शासन निर्णयान्वये पुढील अटींच्या अधीन राहून सशर्त वितरीत करण्यात येत आहे. या मंजूर व मुक्त अनुदानाचे जिल्हानिहाय वाटप सोबतच्या विवरणपत्र "अ" मध्ये तर नगरपालिकांच्या वर्गवारीप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय वाटप विवरणपत्र "ब" मध्ये दर्शविण्यात आले आहे.

- जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी सदर अनुदान, यासोबत जोडलेल्या विवरणपत्र-ब मध्ये नमूद केलेल्या संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना पुर्नवाटपाद्वारे वाटप करण्यात यावे.

- हया योजनेअंतर्गत मंजूर व मुक्त अनुदानाच्या रकमेचे स्वतंत्र लेखे ठेवण्यात यावेत.
- संबंधित जिल्हाधिकारी यांनी सदरचे शासनामार्फत मंजूर व मुक्त केलेल्या अनुदानाचे जिल्हयातील संबंधित महानगरपालिका,नगरपालिका यांना पुर्नवाटप करुन तसे शासनास त्वरीत कळवावे.
- संबंधित महानगरपालिका आणि नगरपालिका यांना उपरोक्त मंजूर व मुक्त रक्कम ज्याकरीता मंजूर व मुक्त करण्यात आलेली आहे त्या विनिर्दिष्ट प्रयोजनाकरीताच दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत खर्च करावी.
- जिल्हाधिकारी यांनी या योजनेतंर्गत आपल्या जिल्हयातील संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत निधीचा वर्षनिहाय तपशिल प्राप्त निधीतून हाती घेतलेली कामे, त्यापैकी पूर्ण कामे, अपूर्ण कामे, खर्च झालेली रक्कम व अखर्चित रक्कम इ.बाबतचा अभिलेख ठेवावा व ही माहिती शासनास आवश्यकतेनुसार तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.
- हया योजनेअंतर्गत मंजूर व मुक्त केलेल्या अनुदानातून संबंधित महानगरपालिका व नगरपालिका आणि जिल्हाधिकारी यांनी, हया योजनांकरीता केलेल्या खर्चाचे लेखे तपासणीचे अधिकार महालेखापाल महाराष्ट्र, मुंबई/नागपूर यांना किंवा खास अधिकार दिलेला या विभागातील अधिकारी यांना देण्यात येत आहेत. याबाबत संबंधित कागदपत्रे महालेखापाल किंवा खास अधिकार दिलेला विभागातील अधिकारी यांनी मागणी केल्यास त्यांना संबंधित महानगरपालिका व नगरपालिका आणि जिल्हाधिकारी यांनी तात्काळ उपलब्ध करुन द्यावीत.
- मुंबई वित्तीय नियम,१९५९ मधील जोडपत्र २ मधील नियम क्रमांक ३ अनुसार महालेखापालांच्या मागणीनुसार संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखे संबंधित कागदपत्रांसह निरीक्षणा करीता संबंधित महानगरपालिका, नगरपालिका आणि जिल्हाधिकारी यांनी महालेखापाल यांना सादर करावेत.
- हया योजनेअंतर्गत शासनाकडून जी अनुदाने प्राप्त झालेली आहेत, त्या अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र आणि काम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र (COMPLETION CERTIFICATE), संबंधित महानगरपालिका व मुख्याधिकारी नगरपालिका आणि जिल्हाधिकारी यांनी शासनास द्यावयाची आहेत. मुख्याधिकारी नगरपालिका यांनी उपयोगिता प्रमाणपत्र आणि काम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र (COMPLETION CERTIFICATE), यांमध्ये दर्शविलेल्या मंजूर व मुक्त अनुदानाच्या व खर्चाच्या कार्यक्रमनिहाय रकमा प्रमाणित करुन स्वाक्षरीत कराव्यात. उपयोगिता प्रमाणपत्र आणि काम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र (COMPLETION CERTIFICATE), यांवर जिल्हाधिकारी यांनी प्रतिस्वाक्षरी करावी. अशी प्रमाणपत्रे शासनास स्विकारार्ह होतील. त्याचप्रमाणे काम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र (COMPLETION CERTIFICATE),महालेखापाल यांनाही पाठवावे.
- हया योजनेतंर्गत संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मंजूर व मुक्त करण्यात आलेल्या सदर अनुदानाचा विनियोग संबंधित आर्थिक वर्षातच विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसारच होईल याबाबतची खबरदारी जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.
- हया योजनेअंतर्गत हाती घेतलेल्या कामाची भविष्यकाळातील देखभाल व दुरुस्तीवरील १०० टक्के खर्च संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी त्यांच्या स्वनिधीतून करावयाचा आहे. हया योजनेच्या देखभाल व दुरुस्तीकरिता शासनाकडून कोणत्याही स्वरुपात अनुदान उपलब्ध करण्यात येणार नाही.

- मंजूर व मुक्त अनुदानाच्या खर्चाचा महालेखापाल कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालावा व विहीत अहवाल विहित दिनांकास शासनास सादर करावा.

२. नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजनांबाबत क्रमांक नादपि-२००४/प्र.क्र.२८/पापु-२२, दिनांक २५ ऑगस्ट,२००६ अन्वये निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील सूचनांनुसार आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करावी.

३. प्रस्तुत प्रकरणी होणारा खर्च, मागणी क्रमांक वाय-२, २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१-पाणी पुरवठा, १९२-नगरपालिका/नगरपरिषदांना सहाय्य (०२) राज्य योजना-(०२)(१०) नगरपालिका व नगरपरिषदांच्या नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजनांसाठी सहाय्यक अनुदान (विशेष घटक योजना) (२२१५ २०६२) ३१, सहाय्यक अनुदान, (वेतनेतर), या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व त्याखालील मंजूर तरतूदीतून भागवावा.

४. प्रमाणित करण्यात येते की, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक:- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७ मधील परिच्छेद ७ ते १८ मधील अटी तसेच परिशिष्टातील अ.क्र.३ व ८ मधील प्रत्येक अटींची पूर्तता झालेली आहे.

५. सदर शासन निर्णय हा वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ मधील भाग पहिला, उपविभाग - तीन, अ.क्र.५, परिच्छेद क्र. २७ (२) अन्वये विभागास प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१८०२२८१३०६१८७९२८** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhir Vijay Nikale

Digitally signed by Sudhir Vijay Nikale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bad5b254e42b3c3f9faf360aa0ac7a716f0d923d21cc4ef7c82851395c2c9a88, serialNumber=9ba935b376f098128ad16cbc9ef5abadabfd1ac32668cabb4d9b0072eddcbcd0, cn=Sudhir Vijay Nikale
Date: 2018.02.28 15:07:13 +05'30'

(सु. वि. निकाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री, (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा. राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. अप्पर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) ओल्ड सी.जी.ओ.इमारत, न्यू मरीन लाईन्स, १०१, महर्षि कर्वे मार्ग, मुंबई-४०० ०२०.
७. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) भारतीय लेखा व लेखा परिक्षा विभाग कार्यालय, सिव्हिल लाईन्स, वेस्ट हायकोर्ट रोड, नागपूर-४४० ००१.
८. विभागीय आयुक्त, औरंगाबाद
९. जिल्हाधिकारी, हिंगोली.
१०. संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, शासकीय परिवहन सेवा इमारत, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई-४०० ०२५.
११. संचालक, समाजकल्याण, ३, चर्च रोड, सेंट्रल बिल्डिंग, पुणे-४११ ००१.
१२. सह संचालक, अनुसूचित जाती उपयोजना (सांख्यिकी), समाजकल्याण, ३, चर्च रोड, सेंट्रल बिल्डिंग, पुणे-४११००१.
१३. अधिदान व लेखा अधिकारी, शासकीय कुटीर, नरीमन पॉईंट, मुंबई-४०००२१.
१४. निवासी लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय इमारत, सातवा मजला, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.
१५. जिल्हा कोषागार अधिकारी, हिंगोली.
१६. जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगरपालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली.
१७. मुख्याधिकारी, वसमतनगर नगरपरिषद, जिल्हा हिंगोली .
१८. कार्यासन क्र.विघयो-१,सामाजिक न्याय विभाग,मंत्रालय, मुंबई-४०००३२.
१९. कार्यासन क्रमांक व्यय-३, बीयुडी-१८ व अर्थोपाय, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.४०००३२.
२०. कार्यासन क्र.१४४३ व १४५१ नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२१. कार्यासन क्रमांक पापु-०४ व २० पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय,मुंबई-४००००१.
२२. ग्रंथालय, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ६ वा मजला, विधानभवन, मुंबई-४०००३२. (१० प्रतीसह).
२३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२४. निवड नस्ती (पापु-२१).

शासन निर्णय क्रमांक :-नादव-१११७/प्र.क्र.६६ /पापु-२१,दिनांक:- २८ फेब्रुवारी, २०१८ सोबतचे सहपत्र.

नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजनें अंतर्गत जिल्हाधिकारी यांना मंजूर व मुक्त केलेल्या अनुदानाचे जिल्हानिहाय विवरण.

विवरणपत्र- अ.

(रक्कम रुपयात)

अ.क्र.	जिल्हयाचे नाव	महानगरपालिका	नगरपालिका /नगरपरिषद	एकूण महानगरपालिका व नगरपालिका/नगरपरिषद	मंजूर व मुक्त अनुदान.
१	**२**	**३**	**४**	**५**	**६**
१	हिंगोली	०	१	१	१२,००,०००/-
	एकूण	**०**	**१**	**१**	**१२,००,०००/-**

Sudhir Vijay Nikale

Digitally signed by Sudhir Vijay Nikale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bad5b254e42b3c3f9faf360aa0ac7a716f0d923d21cc4ef7c82851395c2c9a88, serialNumber=9ba935b376f098128ad16cbc9ef5abadabfd1ac32668cabb4d9b0072eddcbcd0, cn=Sudhir Vijay Nikale
Date: 2018.02.28 15:07:46 +05'30'

(सु. वि. निकाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्रमांक:- नादव -१११७/प्र.क्र.६६/पापु-२१, दिनांक: २८ फेब्रुवारी, २०१८ रोजीचे सहपत्र

नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजनें अंतर्गत जिल्हाधिकारी/महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषद यांना मंजूर व मुक्त केलेल्या अनुदानाचे

जिल्हानिहाय महानगरपालिका/नगरपालिकानिहाय विवरण

विवरणपत्र - ब (रक्कम रुपयात)

अ.क्र	जिल्हयाचे नाव	नागरी स्थानिक संस्थेचे नाव व वर्ग	योजना	योजनेची किंमत	१०% लोकवर्गणी	९०% शासनाचा सहभाग	या शासन निर्णयाद्वारे मंजूर व मुक्त अनुदान
१	२	३	४	५	६	७	९
१	हिंगोली	वसमतनगर नगरपरिषद "ब" वर्ग	१) नागरी दलितवस्ती सुधार योजनेअंतर्गत तथागतनगर येथे पाणी पुरवठ्यासाठी १०० एमएम डी आय पाईपलाईन टाकणे. २) प्रभाग क्र. ७ दलितवस्तीमध्ये १०० एमएम डी आय पाईपलाईन टाकणे. ३) गणेशनगरमध्ये १०० एम एम डी आय पाईपलाईन टाकणे. ४) रेल्वे स्टेशन लगत प्रभाग क्र.४ मध्ये पाण्याची टाकी व बोअरवेल करणे, प्रभाग क्र.५ मध्ये गायकवाड यांच्या घराजवळ पाण्याची टाकी व बोअरवेल करणे, प्रभाग क्र.२ बौध्दवाडा येथे पाण्याची टाकी व बोअरवेल करणे.	२४,६०,०००/-	२,४६,०००/-	२२,१४,०००/-	१२,००,०००/-
एकूण नगरपरिषद = १							१२,००,०००/-

Sudhir Vijay Nikale

Digitally signed by Sudhir Vijay Nikale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bad5b254e42b3c3f9faf360aa0ac7a716f0d923d21cc4ef7c82851395c2c9a88, serialNumber=9ba935b376f098128ad16cbc9ef5abadabfd1ac32668cabb4d9b0072eddcbcd0, cn=Sudhir Vijay Nikale
Date: 2018.02.28 15:08:08 +05'30'

(सु. वि. निकाळे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन